आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे



या अंकात

पान ०२ लक्षवेधी– प्राचार्य माधव राजवाडे
आरोग्यमंत्र– डॉ. सुहास पिंगळे

पान ०३ बुकमार्क – अलका गोडबोले
देशोदेशी – सतीश जोशी

पान ०४ साहित्यकट्टा – संगीता बेहेरे

पान ०५ मराठी मनोरंजन विश्व – गणेश आचवल






वर्ष २८ वे अंक अकरावा पृष्ठे ०६ मूल्य: ₹ ५ नोव्हेंबर २०२० www.parlekar.com


## कोव्हीडची भिती झुगारुन पार्ले मार्केट दिवाळीसाठी सज्ज

कोव्हीडच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण लॉकडाऊन ते अनलॉक पाच असे टप्पे पार करत हा हा म्हणता नोव्हेंबर महिना उजाडला. लोकल ट्रेन, मेट्रो प्रवासावरील अटी व नियम बऱ्याच अंशी शिथिल होताना दिसत आहेत. सोशल डिस्टंन्सिंगचे सर्व नियम पाळून व्यायामशाळा, जिम सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वाचनालयेदेखील काही नियम व अटींवर सुरु झाली आहेत. नाट्यगृहे, चित्रपटगृहे लवकरच सुरु होतील असे स्पष्ट संकेत सरकारतर्फे मिळाले आहेत. बहुतेक शाळा, कॉलेजच्या ऑनलाईन परीक्षा होऊन गेल्यामुळे विद्यार्थी देखील निश्चिंत झालेले दिसत आहेत. गेल्या आठ महिन्यांत अनेक सण येऊन गेले. त्यातील सुरवातीचे काही तर संपूर्णपणे बंदिवासात गेले. दरवर्षी जोशात आणि उत्साहात साजरा होणारा गणेशोत्सवदेखील बरयाच अंशी कुटुंबापुरता मर्यादित ठेवून साजरा केला गेला. परंतु आता मात्र हे चित्र थोडेफार बदललेले दिसत आहे. 'दिवाळी आली!' हे मार्केटमधल्या वाढत्या गर्दीवरून ओळखता येते आहे. विजय स्टोअर्स, विष्णू स्टोअर्स, प्रभुकृपा अश्या मराठमोळ्या खाद्यपदार्थांच्या दुकानांवर 'फराळ पाठवा परदेशी'




अशा पाट्या दिमाखात सजल्या आहेत. चकली, लाडू, करंज्या यांसारख्या फराळाच्या जिन्नसांची चित्रं दुकानांवर झळकत आहेत. दुकाने आकर्षक अशा दिव्यांच्या माळांनी सजायला सुरवात झाली आहे. कपड्यांच्या दुकानांमधली गर्दी वाढू लागली आहे. दरवषी नित्यनेमाने होणारी लोकमान्य सेवा संघातील ग्राहक पेठ या वर्षी स्टॉल्सच्या संख्येवर नियंत्रण ठेवत आयोजित करण्यात येत आहे. थोडक्यात, ऑनलाईन खरेदीची सवय होत असलेला ग्राहक परत खरेदीच्या लाईनमध्ये उभा राहिलेला दिसत आहे.

के पूर्व विभागातील बीएमसी अधिकारी डॉ नम्रता तासगावकर यांच्यानुसार गेल्या दीड दोन महिन्यापूर्वीपर्यंत दिवसाला सरासरी ४० ते ४५ पर्यत गेलेला कोव्हीड रुग्णांचा आकडा आता दिवसाला ४ ते ५ वर आला आहे. कोव्हीड सेंटर्स वरचा ताण बऱ्याच अंशी कमी झाला आहे. ही बाब नक्कीच दिलासादायक असली तरीदेखील थंडी व प्रदूषण हे मिश्रण धोकादायक असल्यामुळे दिवाळीतील फटाक्यांच्या बाबतीत काही कडक नियम लागू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकंदरीत चित्र जरी सकारात्मक आणि आशादायी दिसत असलं तरीदेखील आपण सर्व सजग रहिलो, मास्क वापरले आणि स्वच्छतेचे नियम काटेकोर पद्धतीने पाळले तरच ही दिवाळी खऱ्या अर्थाने आनंदी आणि मंगलमय होईल आणि कोव्हीडरुपी शत्रूचा मुळापासून नाश होऊ शकेल यात शंका नाही.




४, रेलकॉन हाऊस, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७
दू : २६१५३०५५ / २६१४९५३५ मो : + ९१ ९९२०१ १४२४०


॥ श्री व्याडेश्वर प्रसन्न ॥

साठे यांचे विजय स्टोअर्स

सहजीवन, ४ श्रद्धानंद रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७. फोन : २६१४६६४१, २६१८८५२९

नमस्कार

सर्व प्रथम सगळ्यांना हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...

सध्या कोरोना व्हायरसने जगभरात धुमाकूळ घातला आहे. आपल्या मुंबईतही काही रुग्ण सापडले आहेत.

सुरवातीचा काही काळ हा सर्वांसाठी संभ्रमाचा होता तो तसा आमच्यासाठीही होता. म्हणून त्या काळात सर्वांच्या काळजी पोटी आम्ही **विजय स्टोअर** बंद ठेवलं होतं. पण आता....

मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्र्यांनी या प्रसंगी ह्या काळात कोणत्या जीवनावश्यक गोष्टी चालू रहातील ह्याची स्वच्छता दिली आहे...

म्हणून आम्ही **विजय स्टोअर दिनांक २६/०३/२०२० पासून रोज सकाळी ९ ते ११** चालू करत आहोत.

मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्र्यांनी आपल्याला या कठीण प्रसंगी **सोशल डिस्टनसिंग** द्वारे कशी काळजी घ्यावी हे सांगितले आहे..... ती सर्व काळजी आम्ही आपल्या काळजीपोटी घेणार आहोत..... याला आपण सहकार्य कराल याची खात्री आहे.

**१) गर्दी करू नका**

**२) सामानाची यादी तयार करूनच घेऊन या.... म्हणजे वेळ जाणार नाही**

**३) कृपया सुट्टे पैसे घेऊन या**

**४) नियमांचे काटेकोर पालन करा सोशल डिस्टनसिंग ठेवा**

**स्वतः ची काळजी घ्या आणि इतरांनाही सहकार्य करा.**

**आमची शाखा कुठेही नाही**



नवरी सजली




**सण समारंभ सुशोभित करण्यास लागणाऱ्या वस्तू मिळण्याचे एकमेव ठिकाण**

**उपलब्ध वस्तू व सेवा**

- समई
- रांगोळी
- मुसळ
- दाराचे तोरण
- सूप
- घर सजावट / फुलांची सजावट
- डेकोरेटेड ट्रे
- रोवळी
- ज्वेलरी
- पायघड्या
- मोत्यांची / फुलांची मुंडावळ
- अंतरपाट
- शेला/उपरणे
- टोपी/फेटा
- पुणेरी/पगडी
- ओटीचा नारळ
- नोटांचा हार
- फुग्यांची सजावट
- ओटीचा रुमाल
- नथ
- रुखवत(लग्न/मुंज)
- नवरीची साडी
- मुंजीसाठी भिक्षावळीची साडी
- हिरवाचुडा
- देण्याघेण्याच्या वस्तू
- औक्षणाचे ताट
- केळीचे खांब

**भाडे तत्वावर मिळणाऱ्या सेवा ( नववारी साडी, धोतर, फेटा आणि पुणेरी पगडी )**

SAJIREE
हसत रहा, "साजिरी" संग सजत रहा

टीम साजिरी


दीपा लेले-चेऊलकर : 98670 88877
रुपेश जानस्कर : 97735 65176
शॉप : 91364 05267

Shop No.6, Pratham Building, Near Prathana Medical, Prarthana Samaj Road, Vile Parle (E), Mumbai - 400057

## संपादकीय

कोव्हिडची जागतिक महामारी सुरु होऊन आता सात महिन्यापेक्षा जास्त काळ उलटला आहे. पहिले काही महिने संपूर्ण लॉकडाऊन पाळल्यानंतर आता केंद्र व राज्य सरकारतर्फे हळूहळू निर्बंध शिथिल करण्यात येत आहेत. ह्याचा अर्थ व्हायरसचा प्रभाव संपला असा नसून जगण्यासाठी आवश्यक असणारे अर्थकारण सुरु रहावे हा त्यामागचा हेतू आहे.

ह्या पार्श्वभूमीवर टिळक मंदिराने ह्या वर्षीसुद्धा ग्राहक पेठ भरवण्याचे ठरवल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. अर्थात हा अंक आपल्या हातात पडेपर्यंत कदाचित ग्राहक पेठ संपूनही गेली असेल, तरी सुद्धा काही मुद्द्यांची चर्चा होणे आवश्यक आहे असे वाटते. महामारी अजून संपली नाही असे पंतप्रधानांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वजण निक्षून सांगत आहेत. आवश्यकता असेल तरच बाहेर पडा, गर्दीची ठिकाणे टाळा अशा सूचना प्रशासन देत असताना गर्दी खेचणारी ग्राहक पेठ भरवण्याचे काय कारण ? 'मॉल सुरु झाले, दुकाने उघडली मग ग्राहक पेठ भरवण्यात काय अडचण आहे ?' असा प्रश्न काही जण विचारतील. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, सरकारने मॉल्स व दुकाने ह्यांना उघडण्याची परवानगी अर्थकारणाच्या अपरिहार्यतेतून दिली आहे, कोरोना संपला म्हणून नव्हे. लोकमान्य सेवा संघासारख्या सामाजिक संस्थेची अशी कोणती अपरिहार्यता होती ? शाळा कॉलेज, देवळे अजूनही बंदच आहेत. रेल्वे प्रवासावर अजूनही निर्बंध आहेत. 'व्यावसायिकांच्या व उद्योजकांच्या अर्थकारणाला चालना देण्यासाठी ग्राहक पेठ भरवली' असे कारण देणाऱ्यांना आम्हाला सांगावेसे वाटते कि पाच पन्नास व्यावसायिकांचे आर्थिक हित जपण्यापेक्षा मंदिराने जर ग्राहक पेठेला येणाऱ्या हजारो पार्लेकरांच्या आरोग्याची काळजी करण्याची भूमिका घेतली असती तर ते संस्थेच्या इतके वर्षे कसोशीने जपलेल्या सामाजिक बांधिलकीशी अधिक सुसंगत दिसले असते. बरे, ह्या दोघांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने थोडी कल्पकता दाखवून व्हर्चुअल ग्राहक पेठसुद्धा भरवता आली असती. असे असताना संस्थेच्या बंद हॉल्समधे ती भरवण्याचा हट्ट का ? आता पेठेला गर्दी झाली तरी धास्ती आणि गर्दी नाही झाली तर सगळेच मुसळ केरात, अशी परिस्थिती आहे.

खरे म्हणजे हा प्रश्न कायद्याचा नसून आपल्या लोकांविषयीच्या काळजीचा व सहवेदनेचा आहे. टिळक मंदिरासारख्या पार्ल्यातील शिखर संस्थेकडे पार्लेकर मार्गदर्शनाच्या अपेक्षेने बघतात, भविष्यात अनुकरणही करतात. इतके दिवस दाखवलेला संयम थोडे दिवस अजून पाळला असता तर पार्ल्यासाठी एक चांगला आदर्श निर्माण झाला असता.

युद्धात शौर्याचे, संकटात धीराचे आणि महामारीसारख्या प्रसंगात हिमतीचे नव्हे तर संयमाचे कौतुक होते. ह्यात गल्लत होता कामा नये !

## लक्षवेधी

आपल्याकडे बऱ्याचदा असे होते की, काही सन्माननीय पदांवरील व्यक्ती म्हटल्या, की त्यांची एक भौतिक प्रतिमा आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. म्हणजे, एखाद्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हटले की आपल्यासमोर, सूट घातलेली, एक गंभीर प्रकृतीची, कठोर चेहऱ्याची एक प्रतिमा येते, पण काही व्यक्तिमत्वच अशी असतात की ह्या रूढ प्रतिमेला ते छेद देतात आणि अश्यापैकीच एक म्हणजे आपल्या साठये महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य, आणि गेली जवळपास साडे तीन दशके पार्ल्यात वास्तव्य असलेले, राजवाडे सर. पण राजवाडे सर, फक्त भौतिक प्रतिमेलाच नव्हे तर इतर रूढ संकल्पनांनाही उभा छेद देतात आणि प्रसन्न व्यक्तिमत्वाबरोबरच, विद्यार्थ्यांना शिक्षणाबद्दल आत्मीयता कशी वाटेल ह्या गोष्टीचाही सतत विचार करत असतात.

सरांचा जन्म मुंबईतच, गिरगावातील. व्यासंग आणि विदवत्ता ह्या त्यांनां वारसाहक्कानेच मिळाल्या, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण गेल्या पिढीतले एक नामवंत लेखक कै. राजा राजवाडे हे त्यांचे वडील. बालपण आणि शालेय शिक्षण गिरगावातच पार पडले. महाविद्यालयीन शिक्षण मात्र सर्वात आधी, विल्सन, मग रुपारेल आणि त्यानंतर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अश्या तीन संस्थांमधून पूर्ण केले. बी.एस,सी. झाल्यावर सरांनी तिथेच पुढे एम.एस. सी. सुद्धा पूर्ण केले. इथे एक थोडी वेगळी बाब लक्षात घेऊया, सरांनी बी.एस.सी. जरी भौतिकशास्त्रात केले होते तरी एम. एस. सी. मात्र त्यांनी इलेक्ट्रॉनिक्समध्ये केले आहे. वडील जरी साहित्यिक असले तरी सरांनी भौतिकशास्त्र हा विषय व्यासंगाला निवडण्यामागे त्यांच्या ज्युनिअर कॉलेजमधील शिक्षकांचा खूप मोठा हात आहे. त्या शिक्षकांनी भौतिकशास्त्रासारख्या अतिशय क्लिष्ट आणि समजायला कठीण अश्या विषयात, सरांच्या मनात गोडी उत्पन्न केली आणि सरांच्या पुढील आयुष्यातल्या विद्यादानाच्या कार्याची पायाभरणीसुद्धा तिथेच झाली. तशी सरांची त्यावेळी पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षा देऊन त्यांत करिअर करण्याची खूप इच्छा होती आणि त्यांनी त्या परीक्षांची तयारी पण केली होती, पण त्या वेळच्या काही कारणांमुळे त्यांना ह्या स्वप्नाचा पाठपुरावा करता आला नाही आणि मग त्यांनी विद्यादानाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.



सुरुवातीच्या काळात जरी त्यांनी ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकवायला सुरुवात केली, तरी त्यांना पहिल्यापासूनच डिग्री कॉलेजला शिकवण्याची इच्छा होती. एलफिस्टन आणि के.सी. कॉलेजमध्ये हंगामी स्वरूपाच्या नोकरीनंतर ते अंधेरीला एम व्ही. एल. यू कॉलेजात दाखल झाले आणि अखेर १९८९ मध्ये ते तेव्हाच्या पार्ले कॉलेजात दाखल झाले आणि एका अतिशय समाधानकारक आणि दीर्घ प्रवासाची सुरुवात झाली. त्यावेळी सोहोनी सर कॉलेजचे प्राचार्य होते. विद्यादानाचे काम इतर प्राध्यापकसुद्धा करतातच पण, सरांचे वेगळेपण असे की, त्यांचा पूर्ण भर हा विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्रासारख्या अवघड विषयात गोडी कशी निर्माण होईल आणि त्यामुळे विद्यार्थी आपणहूनच अभ्यासाकडे कसे वळतील आणि त्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास हा त्रासाचा किंवा वैतागाचा विषय न राहता तो आनंदाचा भाग कसा बनेल, ह्यावर होता. त्यांच्या काही शोध–निबंधाचा विषयसुद्धा हाच होता आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे त्यांनी ज्या विषयात पीएचडी केली तो सुद्धा ह्याच विषयाशी निगडित होता.

सरांनी अध्यापनाबरोबरच कॉलेजमधील अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनात आणि वेगवेगळ्या व्यवस्थापकीय कार्यात आपला सहभाग नोंदवलेला आहे. त्यांनी लिहिलेल्या आणि वेगवेगळ्या विज्ञान विषयाला वाहिलेल्या जर्नल्समधून प्रसिद्ध झालेल्या लेख आणि शोधनिबंधांची नुसती यादी करायची म्हटली तरी एका संपूर्ण आणि दीर्घ लेखच लागेल. आणि सरांनी अध्यापनाबरोबरच कॉलेजबाहेरच्या जगातसुद्धा अनेक महत्वाच्या प्रकल्पात भाग घेऊन ती यशस्वी केलेली आहेत, आणि त्याचबरोबर अनेक महत्वाची पदेही भूषविली आहेत आणि काही जबाबदाऱ्या तर आजही पार पडत आहेत. आपण ह्या तिन्ही बाबींचा थोडक्यात परामर्श घ्यायचा प्रयत्न करूया. सर्वात महत्वाचे म्हणजे, सरांनी त्यांच्या प्रबंधात, मुलांना त्यांचे ज्ञान स्वतःच रचता येईल, अशा पद्धतीचा आधार घेत सरांनी आपल्या संशोधनात एका स्वयं अध्ययनाचा प्रकार सुचवला आहे. ह्यांत भौतिकी, संख्याशास्त्र, शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र ह्या शाखांचा एकमेकांशी संबंध येणारे तंत्र विकसित केले गेले आहे. ह्या व्यतिरिक्त, सरांनी एफवायच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमात मदत करणारे 'हँडबुक ऑफ प्रॅक्टिकल फिजिक्स ' हे पुस्तक लिहून प्रकाशित केले आहे. सर, २०१३ सालापासून ते आजतागायत विज्ञान भारतीसारख्या प्रतिष्ठित संस्थेचे, कोंकण प्रांताचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. विज्ञान भारतीचा मूळ उद्देश हा, भारतीय संस्कृतीचा ठेवा, भौतिक आणि आध्यत्मिक ह्या दोन्ही विज्ञानांचा समन्वय साधून, परस्परपूरक अशी उन्नती करणे आणि त्याचबरोबर ही विज्ञानाची अनोखी चळवळ, सर्व भारतीय भाषांमधून जनसामन्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे. तसेच आजही ते, मराठी विश्वकोशाच्या विज्ञानाच्या शाखेशी संबंधित कामाच्या समितीचे समन्वयक म्हणून काम करत आहेत. गेली जवळपास साडे तीन दशके सर विद्यादानाचे कार्य निष्ठेने करत आहेत आणि ह्या काळात त्यांनी बऱ्याच कार्यशाळांचे आयोजन केले आहे आणि स्वतः भागही घेतला आहे. ह्या काही ठळक बाबी आपण बघितल्या कारण खरेच त्यांनी एव्हढे काम करून ठेवले आहे की त्याचा नुसता उल्लेख करण्याससुद्धा काही पाने लागतील.

सर, २०१८ पासून प्राचार्य म्हणून काम पाहत आहेत आणि त्यांच्या निवृत्तीपर्यंत ते हे पद भूषवतील. आपल्याकडे असलेल्या विद्ववत्तेचे आणि व्यासंगाचे अजिबात ओझे न वाहणाऱ्या, ह्या विरळा प्राचार्यांना, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा !

दीपक आचार्य
९८३३०२५२२७

## आरोग्यमंत्र

डॉक्टर काय वाटतय आईचं? काळजीयुक्त स्वरात अंजू काळे व्हीजटला आलेल्या फॅमिली डॉक्टरांना विचारू लागली.




असे प्रसंग गेल्या चाळीस वर्षात एक फॅमिली डॉक्टर म्हणून मी अनेकदा अनुभवले आहेत. वरील संवादातील मुख्य व्यक्ती आई( शकुंतला काळे) वय नव्वद,मधूमेह,उच्चरक्तदाब व हृदय विकारग्रस्त रूग्ण. पार्ल्यातील बहुतेक घरात एकतरी वृद्ध व्यक्ति अशा अवस्थेप्रत जात आहे. ही व्यक्ती कोणाची आई, वडील या नात्याने जोडलेली असते व सोबतीला असलेल्या अनेक आजारांच्या गुंतागुंतीमुळे कधीतरी रूग्णालयाची पायरी चढावी लागते. वरील उदाहरणातील अंजू काळेला मी सर्व परिस्थिती समजावून सांगितली व शकुंतलाबाईंना येणारा सततचा खोकला हा हृदयविकाराशी संबंधित आहे असे माझे निदान आहे व त्यांच्या काही तपासण्या तातडीने करणे आवश्यक आहे असे सुचविले. मग तपासण्या कधी, कुठे इ. प्रश्न विचारले गेले.

यातून आपण एका फार मोठ्या सामाजिक प्रश्नाला सामोरे जातो व तो प्रश्न म्हणजे ज्येष्ठ नागरिकांची आजारातील उपाय योजना कशी व किती करावी!

आज आधुनिक वैद्यकात हे एक वेगळेच शास्त्र प्रगत झाले आहे. (Geriatric Medicene) या अनुषगाने वृद्धाश्रम व इतर संस्थात्मक सेवा उपलब्ध आहेत.

आपल्याकडे यावर होणारा खर्च व्यक्तिगत पातळीवरच करावा लागत असल्यामुळे आर्थिक पैलूचा विचारही क्रमप्राप्त होतो.

या पुढील लेखांमधून या विविध बाबींचा उहापोह करू!

डॉ. सुहास पिंगळे
९३२२२५०८३०


# गुलमोहोर ट्रॅव्हल्स

सुबोध जोशी आयोजित नोव्हेंबर ते डिसेंबर २०२०

प्रत्येक रविवारी एक दिवसीय मधील सहली

| | |
|---|---|
| २२ नोव्हेंबर | चंदरगांव, केसरकर फार्मस्, कवेले धरण परिसर |
| २९ नोव्हेंबर | अप्पर वैतरणा, इगतपुरी, भावली धरण |
| ०६ डिसेंबर | मळवंडी लेक, पवना डॅम |
| १३ डिसेंबर | पिंपळगांव जोगा, माळशेज घाट |
| २० डिसेंबर | तांबडी अष्टमी, रोहा, मधुबन ॲग्री टुरीझम |
| २७ डिसेंबर | सूर्यमाळ, जव्हार |

संपर्क : 02226147888 / 9769008775 / 9869376515

GOLDEN GATE PROGRAMME
107 B, 1st Floor, Hemu Arcade, Vile Parle (W), Mumbai- 400 056.
www.goldengatetoiit.co.in

ATTENTION

STD-X STUDENTS, (ICSE, CBSE, IGCSE, SSC) 2 YEAR GROUP TUTION PROGRAMME FOR


JEE MAIN AND JEE ADVANCED
Covering
JEE Main, JEE Advanced ETSAT, MHT CET
Chemistry : Dr. U. R. Kapadi, Ph. D., IT (Bombay)
Prof. Tarun Ahinar, E. Tech IIT ISM Dhe;bad
Physics : Prof. Manoj Karmarkar, H. Tech., IIT (Bombay)
Mathematics : Prof. Vinayak Antarkar, H. Tech., IIT (Bombay)

JEE MAIN AND MHT CET
Covering
XI, XII (H. Sc.), M-T, CET, JEE MAN
Chemistry : Dr. U. R. Kapadi, Ph. D., IT (Bombay)
Prof. Pritam Panchal, MSc, IIT (Bombay)
Physics : Prof. Devendra Verma, M. Sc. Physics
Prof. Saurabh Phansalkar
Mathematics : Prof. Vinayak Antarkar, E. Tech., IIT (Bombay)
Prof. c. B. Thita, E. Tech., IIT (Bombay)

Seminars I Enbrance Tests I Counseling Sessions. CONTACT US : Prashant Sir : 7039679129 / 9004607404

तुम्ही आत्तापर्यंत सर्वात मोठं पुस्तक म्हणजे किती मोठं पाहिलं आहे?

तुम्ही भा.रा. भागवतांचं मायापूरचे रंगेल राक्षस वाचलं आहे का? त्यात पहिल्याच प्रकरणात जानू शेतकऱ्याचं संपूर्ण शेत व्यापून टाकणाऱ्या, सर्व राक्षस कुळांचा इतिहास असलेल्या पुस्तकाचं वर्णन आहे. भागवतांना ही कल्पना कदाचित मंडालेतल्या कुथोडा पागोडाच्या आवारातल्या त्रीपिटका ह्या बौद्ध धर्मातल्या पवित्र शास्त्रवचनांच्या पुस्तकावरूनच सुचली असेल. कारण साधारण पुरुषभर उंच आणि दोन हात रुंदीची अखंड संगमरवराची शिळा म्हणजे एक पान, ह्या प्रत्येक पानावर पाठपोट ८०-१०० ओळी कोरलेल्या आणि अशी ७२९ पानं नजर पोचेल तेथपर्यंत एका मैदानावर पसरलेली, असं हे पुस्तक आहे! हे पुस्तक संपूर्ण वाचण्यासाठी काही मैलांचा फेरफटका मारावा लागतो. म्हणजे बुद्धीविकास आणि शारीरिक तंदुरुस्ती असे एका दगडात दोन पक्षी! जर हे पुस्तक कागदावर छापलं तर ४०० ऑक्टेवो आकाराच्या पानांचा एक, असे ३८ खंड भरतील!



एकोणिसाव्या शतकात म्यानमारचा राजा मिन्दोन आपलं राज्य ब्रिटीश आक्रमणापासून वाचवायला झगडत असताना हे जगातलं सर्वात मोठं पुस्तक बांधलं गेलं. त्यावेळेपर्यंत ब्रिटीश फौजांनी दक्षिण म्यानमार जिंकून, लुटून उद्ध्वस्त केला होता. आणि उरलेल्या आपल्या राज्याचीही अशीच वाताहत होणार हे मिन्डोनला कळून चुकलं होतं. तेंव्हा आपल्या धर्माचा सर्वात पवित्र वारसा अविनाशी स्वरुपात कायमचा टिकावा अशा काहीश्या विचारातून ह्या पुस्तकाची निर्मिती झाली असावी. आजही कुथोडा पागोडाच्या आवारात नजर पोचेल तेथपर्यंत रेखीव रांगांमध्ये बांधलेल्या सुंदर शुभ्र घुमट्या, प्रत्येक घुमटीमध्ये एक भव्य वळणदार अक्षरं कोरलेलं पान असं हे थक्क करणारं दृष्य पाहायला मिळतं (पहिला फोटो) त्या कोरलेल्या अक्षरांत एकेकाळी भरलेलं सोनं मात्र ब्रिटीश सैनिकांनी लुटून नेल्यामुळे आज त्यात काळा रंगच फक्त दिसतो!

## देशोदेशी

म्यानमारमधला आणखी एक चमत्कार म्हणजे बर्मा टीक नावाने प्रसिद्ध असलेलं लाकूड. गीतेमध्ये आत्म्याचं वर्णन करताना म्हटलं आहे – न चैनं क्लेदयन्त्यापो, न शोषयति मारुतः ! हे बर्मा टीकचंच वर्णन आहे. उन, पाउस, वारा इतकच काय वाळवीसुध्दा त्यावर शतकानुशतकं काहीही परिणाम करु शकत नाही. आजही संपूर्णपणे ह्या लाकडाने शेकडो वर्षांपूर्वी बांधलेल्या भव्य इमारती टिकून आहेत. उदाहरणार्थ दुसऱ्या फोटोतला मिन्दोन राजाचा महाल. संपूर्णपणे लाकडात बांधलेली ही ५ मजली इमारत आज २५० वर्ष उभी आहे. आज त्यात श्वेनानडाव नावाचा मठ आहे. किंवा हे शेवटचे २ फोटो पहा – महामुनी बुद्ध पागोडातल्या लाकडात कोरलेल्या कमानी – दीडदोनशे वर्ष जुन्या!



वयाच्या साठीपर्यंत मला म्यानमार बद्दल फक्त दोनच गोष्टी माहित होत्या. लोकमान्य टिळकांचा मंडाले येथील कारावास ही एक आणि ब्रह्मदेशाचा राजा थिबाची रत्नागिरीत मरेपर्यंत नजरकैद, ही दुसरी. पण बौद्ध धर्माचा प्रभाव आणि स्थानिक संवेदनांच्या संगमातून तिथे निर्माण झालेला ह्या त्रीपिटका ग्रंथासारखा कलाविष्कार पाहण्यासाठी दोन आठवडे सुद्धा पुरणार नाहीत असं कधीच वाटलं नव्हतं. खरं तर जे थोडं फार मी पाहिलं तेव्हढच सांगायला आणखी ५ लेख सुद्धा कमी होतील. पण पुढच्या वेळी आपण सातासमुद्रापार पेरू आणि बोलीव्हिआला भेट देऊ.

सतिश जोशी
९८२०२२८२७९


॥ग्रंथाली॥✲॥

दिवाळी भेट योजना

पाच दिवाळी अंक
शब्द रुची, अंतर्नाद, मौज, पद्मगंधा, ऋतुरंग
+
स्टोरी टेलचे मराठी, इंग्रजी, हिंदी साहित्य
तीन महिने ऐकण्यासाठी पासवर्ड भेट
(app डाऊनलोड करणे)
+
दिवाळी पहाट पाहण्यासाठी
तुमच्यासाठी एक + आप्तेष्टांना भेट देण्यासाठी
चार कोडनंबर

सहभागी कलावंत
सचिन खेडेकर, संपदा जोगळेकर-कुलकर्णी, स्पृहा जोशी, दीपक करंजीकर, सुमीत राघवन आणि अशोक नायगावकर

या तिन्ही गोष्टींची एकत्रित किंमत
फक्त रु. १,००० (एक हजार रुपये फक्त)
मूळ किंमत २०४९/-

संपर्क – डॉ. लतिका भानुशाली (विश्वस्त-ग्रंथाली)
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
वरील व्हॉट्सअप नंबरवर संदेश पाठवणे



आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

सहाय्यक संपादिका
भाग्यश्री महाजन
editorial@parlekar.com

निर्मिती प्रमुख
अनिता चांदेकर

सजावट व मांडणी
सुबोध टाईपरायटर्स

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com

कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com


## मुंग्यांची शाळा

**प्रशांत राऊत**

बुकमार्क

१९६४ साली, 'बालकवितेचे स्वरूप' या लेखात 'ज्ञानपीठ' पुरस्काराने सन्मानित आणि उत्तम बालकविता लिहिताना 'हिमालयाच्या वर आणि तिबेटच्या खाली' असा 'एटू लोकांचा देश' निर्माण करणाऱ्या विंदा करंदीकर यांनी म्हटलंय की 'बाल मनाशी जिव्हाळ्याचा संवाद साधणारी कविता म्हणजे बालकविता'.

मुलांच्या आंतरिक मनात डोकावणे आणि त्याच्याशी तद्रूप होणे हे काही सोपे काम नाही. म्हणूनच 'बालसाहित्य' हा विषय जिव्हाळ्याचा असला तरी बाल साहित्य निर्माण करणारे हात मोजकेच. 'मुंग्यांची शाळा' लिहिणारे प्रशांत राऊत या मोजक्या हातांपैकी एक!




या पुस्तकाला सुप्रसिद्ध साहित्यकार 'एकनाथ आव्हाड' यांची अतिशय सुंदर विश्लेषण- रसग्रहण करणारी प्रस्तावना लाभली आहे. ते म्हणतात, प्रशांतजींच्या बालकवितांतून डोकावणारा निसर्ग त्यांनी स्वतः आधी बालपणापासूनच अनुभवलेला आहे आणि तो अनुभव, ती निरीक्षणे त्यांच्या कवितेत, मुलांच्या कल्पना विश्वातून, त्यांचे भावनिक संदर्भ घेऊन उतरतात.

बालमनाला कल्पित जगाचे विलक्षण आकर्षण असते. कल्पित आणि वास्तवाचे विलक्षण अनोखे मिश्रण असते. त्यात त्यांचे कुतूहल आणि निरीक्षण मिसळले की मग 'मुंग्यांची शाळा' भरते. 'माकडाचा दवाखाना' उघडतो, मग भले तो एक दिवसात बंदही होतो. माणसांच्या मुलांच्या शाळेप्रमाणे मुंग्यांच्या शाळेतील मुंग्या- शहाण्या मुंग्या शाळेत जातात रांगेत, पण गंमत पुढे वेगळीच आहे, कारण अभ्यास-परीक्षा अशा रुढ कल्पनांना बगल देत नाट्यमयता येते कारण मुंग्यांच्या शाळेत
परीक्षाच नाही
जो तो आपोआप
पुढच्या वर्गात जाई.

प्राण्यांच्या शाळेत खडू किंवा फळा नाही पण काहीबाही शिकून सारे शहाणे मात्र झाले आहेत. माकडांच्या दवाखान्यात, माणसांच्या जगातल्या 'इंजेक्शन आणि कॅप्सूल' आहेत, औषधे मोफत मिळणार आहेत खरी, पण दवाखाना थाटलाय तो 'पिंपळाच्या झाडावर' त्यांच्या सशाला 'स्वप्न' पडतात आणि कासव स्वतःच्या पाठीवरच घर थाटते. कावळ्यांची सभा भरते पण सभेला 'विषय' नाही 'चर्चा काय करायची याची माहिती नाही असा सगळा गोंधळ'. 'आनंदी पाखरं...' कविता पाखरांच्या मदतीने आकड्यांची ओळख करून देते. गंमत अशी की 'मोर' एकच आहे पण मधमाशा मात्र 'दहा' आहेत.

'ढग', 'चांदोबा', 'उंदीरमामा' यांच्याशी थेट संवाद आहेत. चांदोबा अचानक लुप्त होण्यातले गुपित जाणून घ्यायचंय. खेळून खेळून ढग मळतो आणि पाऊस आणतो आहे. 'पहिला पाऊस' आनंददायी आहे. मुले छत्रीत सुखावली आहेत. 'येरे येरे पावसामध्ये' पावसाची शाळेला बुट्टी मारत, कट्टी-बट्टीचा खेळ आहे.

राऊत यांच्या कवितांचे मराठी समाज जीवनाशी, समाज परिसर, त्यांच्या सांस्कृतिक श्रद्धा, लोककथा यांच्याशी जिव्हाळ्याचे नाते आहे. बगळे, मासे खाण्यासाठी 'ध्यानस्थ' बसतात आणि स्वतःचे पोट भरले की पिल्लांसाठी मासे चोचीत घेऊन जातात. त्यांचा उंदीर इटुकला असला तरी 'गणेशकाया' महान सहज वाहून नेतो आणि खारुताई तिच्या मऊ पाठीवर हात फिरवल्यावर...

रामाच्या जणू हाताला
होईल माझा स्पर्श
गगनात मावेनासा
होईल माझा हर्ष

अशी आनंद विभोर अवस्था होणार आहे.

विंदा करंदीकर असेही म्हणतात की बालकवितेला समकालीन प्रेरणांशी जिवंत नाते जोडता आले पाहिजे. आणि याच प्रकारचे नाते 'आजीची भाजी' त तिच्या स्वयंपाकाचे आणि प्रेमळपणाचा मायेचा स्पर्श सर्वांना लाभू दे' या विनंतीत आहे. प्रत्येकाला आपापल्या गावी पोहोचवून सेवा देणाऱ्या 'एसटी बस'मध्ये आहे 'चिऊताई का ग....'मध्ये मुंबईतून गायब झालेल्या चिमण्या आपल्यावर रागावल्याची शंका आहे. त्याचबरोबर तिच्यासाठीच 'बाल्कनीत घर बांधल्याचे' वास्तव आहे. केवळ चिमणीच गायब झालेली नाही तर, 'जंगल' 'इंटरनेटवर', हत्ती मोबाइलवर,साप टीव्हीवर,चिमणी व्हिडिओगेममध्ये, तर बाहुली लॅपटॉपवर बघायची वेळ येणार आहे. या भीषण भविष्याच्या चित्रात भेदरलेल्या मुलीला...

सगळं झालंय सॉफ्ट सॉफ्ट
आजकालच्या जगात
रमायचं तरी केव्हा आम्ही
खऱ्याखुऱ्या निसर्गात !

असा मूलभूत प्रश्न पडला आहे.

चेतनागुणोक्ती अलंकाराचा वापर करीत, मानवेतर जगाचे मोठ्या प्रमाणात मानवीकरण करीत, सोप्या भाषेत, कमी शब्द वापरीत लिहिलेल्या या नादानुकारी कविता, आजच्या 'कोव्हिड'च्या काळात घरात बंदिस्त झालेल्या पालकांनी 'किंडल' वर प्रकाशित झालेल्या या कविता मुलांना वाचायला द्यायला हव्यात किंवा त्यांच्याबरोबर बसून स्वतः त्या कवितांचा आनंद मुलांपर्यंत पोहोचवायला हवा.

अलका गोडबोले
९९६७६६६६७०





सविता दामले

मला मराठी आणि तमिळ दोन्ही भाषा येत असलेली लेखिका अनुवादासाठी हवी होती. इंग्रजी अनुवादावरून तू मराठीअनुवाद करणार ते बरोबर कसं होईल? तमिख लेखिका श्रीमती अंबईंचा असलेला हा तक्रारीचा सूर प्रत्यक्षात मराठी अनुवाद बघताच गळून पडला. अंबईंना स्वतःला मराठी येत होतं. एकेका परिच्छेदाचा अनुवाद तपासल्यावर मात्र त्यांनी पूर्ण समाधानाने सविताताईंची पाठ थोपटली.

अनुवादकार म्हणून नाव मिळवलेल्या मराठी लेखिकांत श्रीमती सविता दामले हे नाव चांगलेच गाजत आहे. गिरगावातील शारदा सदन या मराठी शाळेत व नंतर अंधेरीतील परांजपे विद्यालय आणि पार्ल्याच्या डहाणूकर मध्ये शिक्षण घेतलेल्या सविता ताईंना साहित्याचा समृद्ध वसा मिळाला तो त्यांच्या वडिलांकडून श्री. विष्णूपंत आठवले यांच्याकडून. चांगले लेखन,उत्तम काव्य व शिक्षण याचे संस्कार पंतांनी आपल्या मुलांवर केले. तर लग्नानंतर शिक्षण घेऊन एलआयसीत नोकरी करून अधिकारी पदापर्यंत गेलेल्या आईकडून म्हणजेच श्री. सिंधुताई आठवलेंकडून चिकाटी व परिश्रमाचे संस्कार मिळाले. त्यामुळेच कॉमर्स ग्रॅज्युएट होऊन सविताताईंनी स्टेट बँक ऑफ इंडियात नोकरी धरली व त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या.

पण त्यांचा पिंड मात्र साहित्यिकाचाच. लहानपणापासून निबंध लिहिणे, कविता करणे याची आवड त्यांनी जोपासली. राज्य मराठी विकास संस्थेने नोबेल प्राईज विजेत्या लेखकांच्या पुस्तकांची अनुवाद योजना आखल्याचं त्यांच्या वाचनात आलं. तेव्हा एक वेगळा अनुभव म्हणून त्यांनी 'पर्ल बक' यांच्या 'पॅव्हेलियन ऑफ विमेन' या पुस्तकाची वीस पाने अनुवादित करून पाठवली. तेव्हा तिथे काम करणाऱ्या 'कविता महाजन' यांना सविता ताईंनी केलेला अनुवाद खूपच आवडला. त्यांनी त्यांना पुस्तकाच्या अनुवादासाठी बोलावून घेतले.

एकदा अशी संधी मिळाल्यावर मग सविताताईंनी मागे वळून पाहिलेच नाही. स्वतःची नोकरी, दोन मुलगे, त्यात पतींचा स्वतःचा व्यवसाय सांभाळताना दिवस संपून जायचा कसा तेच कळत नसे. पण स्वतःच्या आवडीसाठी पहाटे लवकर उठून त्यांचा लेखन-प्रपंच चालूच राहिला. मधल्या काळात संसारात आलेल्या कठीण प्रसंगांनाही त्यांनी धैर्याने तोंड दिले. पण आपल्या जीवनाचा खरा अर्थ साहित्यात व लेखनातच आहे हे लक्षात आल्याने १९९३ मध्ये नोकरीला रामराम ठोकून त्यांनी पूर्णवेळ लेखनाला द्यायचे ठरवले. त्याचेच फळ म्हणजे आज पस्तीस पुस्तकांचे अनुवाद त्यांनी केले आहेत. तर दोन स्वरचित काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत.'माझे गाणे माझे जगणे' या सुलोचनाबाई चव्हाण यांच्या आत्मचरित्राचे शब्दांकन, रतन टाटा, शर्मिला इरोम यांचे चरित्र, हा माझा मार्ग वेगळा हे परांजपे विद्यालय माजी विद्यार्थी संघाचे पुस्तक तसेच पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंधमालेतील चार पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.

## साहित्य कट्टा

त्यांनी अनुवादित केलेला गुलजार यांचा लेख मराठीच्या शालेय पुस्तकात समाविष्ट आहे. तसेच ऋतुरंग, अंतर्नाद, पद्मगंधा आदी अंकात आणि लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स सकाळ आदी वृत्तपत्रात त्यांनी लिहिलेले लेखन व अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत.

तुम्ही दुसऱ्या इनिंगमध्ये लेखनाचे कार्य करत आहात असे मी म्हटले तेव्हा सविताताई मनापासून म्हणाल्या की, खरे तर लेखन हीच माझी पहिली इनिंग होती, परंतु नोकरी ही दुसरी ईनिंग मी आधी केली आणि लेखनाची पहिली इनिंग आता करते आहे.' अनुवाद कलेबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, अनुवाद म्हणजे परकायाप्रवेशच असतो. भाषांतर करताना त्यातील सहजता टिकवावी लागते. मूळ पुस्तकातील सांस्कृतिक, भौगोलिक,ऐतिहासिक पार्श्वभूमीला धक्का न लागता त्याचा सुगंध वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनुवादकांना करावे लागते. त्यासाठी त्या त्या भाषेचा देशाचा राजकीय, सामाजिक, व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करावा लागतो तेथील भूगोल समजून घ्यावा लागतो. अनेकदा इंग्रजी पुस्तकात भलीमोठी एक एका परिच्छेदाएवढी मोठी वाक्ये असतात. ती तशीच अनुवादित केली तर अतिशय रुक्षपणा येतो. मग लहान मराठी वाक्यात त्यांना बांधून घेऊन त्यातील सत्व वाचकांपर्यंत पोहोचावे लागते. आमच्या भेटीत सविताताई तळमळीने अनुवादाविषयी बोलत होत्या. अनेक कथा, कविता त्यांनी लिहिल्या आहेत. पण स्वतःची कादंबरी लिहिण्याचा आग्रह केला असता त्या आपण होऊन 'माझीही तशी इच्छा आहे' असं मनमोकळेपणे म्हणाल्या. त्यांच्या लहान मुलांच्या कविता आपल्याला बालपणात घेऊन जातात तर लघुकथांपासून अर्थशास्त्र, राजकारणापर्यंत आणि पौराणिक विश्लेषणापासून इस्रायलपर्यंत वेगवेगळ्या विषयातील पुस्तकांच्या अनुवादाचा आवाका आपल्याला थक्क करून सोडतो. पण त्याचबरोबर त्या त्या जगताची सफर वाचकाला करून आणतो. त्यामुळेच त्यांनी अनुवादित केलेल्या मनगंगेच्या काठावर ह्या राजहंस प्रकाशनाच्या पुस्तकास आपटे वाचन मंदिराचा उत्कृष्ट अनुवादाचा पुरस्कार मिळाला तसेच सोनिया गांधी ललित चरित्रासाठी श्रीस्थानक पुरस्कारावर त्यांचे नाव कोरले गेले. तसंच मराठी अनुवाद क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारी महिला म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई या प्रथितयश संस्थेनेही विद्यमान वर्षात त्यांना गौरवले आहे.

गेले काही महिने पार्लेकर सविताताईंनी आपल्या वाचकांना वेगवेगळ्या साहित्यिकांची ओळख करून दिली. पण आज त्यांची ओळख करून देताना आम्हा पार्लेकरांना मनापासून आनंद होत आहे.

संगीता बेहेरे
९८६७७५८३१०

# हरहुन्नरी पार्लेकर व्यक्तिमत्व हरपले

## उदय भागवत यांचे दु:खद निधन

माणसाच्या मनाचे कंगोरे खुबीने जाणारे एक दिलदार आणि हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणजे उदय भागवत. वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांना आपलेसे करून मैत्री जोपासण्याची कला ही त्यांची विशेषता होती. अगदी पारल्यातल्या हॉटेल रामकृष्णच्या दरवानापासून ते मराठी आणि हिंदी कलाक्षेत्रातील मंडळींशी त्यांचे खास मैत्रीचे संबंध होते.



पारल्यातील उद्योजक माधवराव भागवत आणि महिला संघाच्या संस्थापिका मंगलाबाई भागवत यांचे जेष्ठ चिरंजीव उदय भागवत. वडिलांकडून उद्योजकतेचे आणि आईकडून समाजसेवेचे बाळकडू मिळालेल्या भागवतांनी रसायन शास्त्रातील पदवी शिक्षण पूर्ण करून आपल्या करिअरची सुरुवात वडिलांच्या युनायटेड मेटल्स कंपनीमार्फत केली. पुढे त्यांनी केम डाइज आणि श्री नारायण ऑरगॅनिक अशा दोन केमिकल कंपन्या यशस्वी रीतीने उभ्या केल्या.

उद्योजकतेचे करिअर असलेल्या भागवत यांनी ज्योतिषशास्त्र आणि जुने हिंदी चित्रपट संगीत याच्या सखोल अभ्यासाचा छंद लहानपणापासून जोपासला होता. सुप्रसिद्ध ते अति दुर्मिळ गाण्यांच्या ध्वनिफिती त्यांच्या संग्रही होत्या. प्रख्यात संगीत कंपन्यांना जेव्हा दुर्मिळ गाण्यांची कमतरता भासत असे त्यावेळी ते भागवतांशी आवर्जून संपर्क करत. व्यवसायातून निवृत्ती घेतल्यानंतर जुन्या हिंदी चित्रपट संगीताचा अभ्यास आणि आनंद जोपासण्यासाठी त्यांनी आपल्या मित्रमंडळींबरोबर 'सरगम' या म्युझिक ग्रुपची स्थापना केली. महिन्यातून एकदा रविवारी संध्याकाळी होणाऱ्या त्यांच्या संगीताच्या कार्यक्रमांसाठी मुंबईच्या वेगवेगळ्या भागातून लोक येत असत. गाण्यातील सौंदर्य, त्यातील कलाकार, संगीत दिग्दर्शक, वापरलेली विविध वाद्ये, रचना आणि रचनाकार यांच्या सुरस गोष्टी त्यांच्या खास विनोदी शैलीत सांगून ते श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असत. अगदी लॉकडाऊनच्या काळात स्वतःची प्रकृती थोडी नाजूक असतानाही नवीन तंत्रज्ञानाची कास घेऊन यूट्यूबद्वारे त्यांनी आपल्या संगीत कार्यक्रमाचा महायज्ञ सुरु ठेवला. त्यांच्या पंचवीस कार्यक्रमांची 'गीतमाला' युट्युब डॉट कॉम उदय भागवत येथे उपलब्ध आहे.


त्यांना दत्तभक्ती अत्यंत प्रिय होती. आयुष्यात आलेले चढ-उतार, बदल त्यांच्या अध्यात्मिक बैठकीमुळे त्यांनी सहजरित्या अगदी हसतमुखाने स्वीकारले. कठीण प्रसंगातून धडाडीने सामोरे जाताना त्यांची विनोदबुद्धी किंवा हास्य कधीही मावळले नाही. हे मार्गक्रमण करीत असताना त्यांना त्यांच्या कार्यशील पत्नी अनिता भागवतांनी खूप खंबीरपणे साथ दिली. आज वडिलांसमान असलेले माझे सासरे आपल्यात नाहीत पण, त्यांनी आम्हा मुलांना दिलेली 'Forgive and Forget' ची शिकवण आणि दत्तभक्तीची शिदोरी आमच्या जवळ सदैव राहणार आहे.

मानसी भागवत



## मराठी मनोरंजन विश्व

### “कारखानीसांची वारी”




मराठी चित्रपट सातासमुद्रापलीकडे पोचले, हे आता आणखी एका चित्रपटाच्या बाबतीत खरे ठरले आहे आणि तो म्हणजे ’कारखानिसांची वारी’ हा मराठी चित्रपट. यंदाच्या तेहतिसाव्या आंतरराष्ट्रीय टोकियो चित्रपट महोत्सवात या चित्रपटाची निवड झाली आहे. ’वारी ’ म्हटले की आठवतो तो प्रवास. हा चित्रपटदेखील एका प्रवासावर आधारित आहे. एका कुटुंबाचा प्रवास विनोदी ढंगातून दाखवण्याचा यात प्रयत्न केला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन मंगेश जोशी यांचे आहे. ’नाईन आर्चर्स पिक्चर्स कंपनी’ आणि ’प्रवाह निर्मिती’ यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटात अमेय वाघ, मृण्मयी देशपांडे, मोहन आगाशे, गीतांजली कुलकर्णी, प्रदीप वेलणकर, वंदना गुप्ते, शुभांगी गोखले अशा मान्यवर कलावंतांच्या भूमिका आहेत. या चित्रपटाला ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे संगीत आहे.

### कॉमेडी बिमेडी




स्टार प्रवाह वाहिनी विविध मालिकांची निर्मिती करून दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रियता मिळवत आहे. यंदाच्या दिवाळीत स्टार प्रवाह वाहिनीवर ’कॉमेडी बिमेडी ’ हा कार्यक्रम १५ नोव्हेंबर पासून रसिक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या अनोख्या कार्यक्रमातून सुप्रसिद्ध असे १६ विनोदी अभिनेते आणि अभिनेत्री रंगतदार स्किट्स सादर करणार आहेत. मात्र इतर रियालिटी शो प्रमाणे इथे कोणतीही स्पर्धा नसणार आहे. या विनोदवीरांच्या जोड्या फक्त स्किट्सच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करतील. या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालक देखील नसेल. आशिष पवार, दिगंबर नाईक, मंगेश देसाई, अंशुमन विचारे, संतोष पवार, कमलाकर सातपुते, शेखर फडके तसेच किशोरी अंबिये, परी तेलंग, देवयानी मोरे, आरती सोळंकी, पूर्णिमा अहिरे, प्राजक्ता हनमघर, बालाजी सूळ हे कलावंत आपली कला सादर करणार आहेत. स्टार प्रवाहचे कार्यक्रम प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, सध्याच्या कठीण काळात मनमुराद हसणं राहून गेलं होतं. आता या कार्यक्रमातून तासभर धमाल करूया आणि रिफ्रेश होऊया .

– गणेश आचवल
९८३३२६८३९१




## पार्लेकर Channel

**कोव्हीडचा परिणाम इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे सांस्कृतिक क्षेत्रावरदेखील मोठ्याप्रमाणावर पडला आहे. कलाकाराला याची देही याची डोळा अर्थात प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळत नसल्यामुळे कलावंत आणि रसिक यांना ऑनलाईन भेटीतून दुधाची तहान ताकावर भागवावी लागते आहे. आम्ही पार्लेकरच्या युट्यूब चॅनलने हा योग जुळवून आणला. सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका गौरी पाठारे यांच्याशी संगीत अभ्यासक केशव परांजपे यांनी घेतलेल्या मुलाखतीचा काही अंश .....**



**पार्ल्याचा आणि आपला ऋणानुबंध कसा जुळला ?**

२५ वर्षांपूर्वी ’स्वरमाउली’ या (केशव परांजपे) याच्या संस्थेअंतर्गत एका कार्यक्रमात प्रथमच (माहेरची) गौरी दामले असताना गाण्याची संधी मिळाली आणि पार्लेकरांचे आणि माझे ऋणानुबंध जुळले गेले ते कायमचे.

**पारल्यातील रसिकांना तुम्ही इतर गुणी कलावंतांचे गाणेही ऐकवलत, या मागील तुमच्या काय भावना होत्या?**

पार्ल्यात संगीताचे कार्यक्रम होत असले तरीही काही मोठ्या व्यावसायिक गायकांना ऐकण्याचा योग पार्लेकरांना आला नव्हता. या हेतूने ’पार्ले वसंतोत्सव’ ही सांगीतिक चळवळ सुरु केली. यासाठी रामान्जानेय या संस्थेच्या शानबाग कुटुंबीयांच्या कलेप्रतीच्या निरपेक्ष प्रेमाने मंदिरातली पुढील जागा कार्यक्रमांना वापरायला दिली आणि त्या योगे अनेक गुणी कलावंतांना ऐकण्याची संधी पार्लेकरांना मिळाली.

**शिष्य, गुरू आणि एक कलाकार ही त्रिसूत्री भूमिका जगताना कलाकाराची नेमकी मानसिकता काय असते?**

माझ्या मते आमच्या फळीतल्या कलावंतांसाठी ही एक तारेवरची कसरतच असते. म्हणजे असं की, मी गेली पंचवीस वर्षे या क्षेत्रात आहे. रसिकांना माझ्याकडून काही अपेक्षा आहेत. मी आजही माझ्या गुरूंकडून शिकते आहे आणि त्याचबरोबरीने तरुण पिढीतील कलाकारांना शिकवते आहे. नावलौकिक प्राप्त झालेल्या बुजुर्ग कलाकारांना रसिकश्रोते प्रेमाने आणि आस्थेने ऐकतात, नवीन कलाकारांना, थोडासा अधिक रियाज केला तर पोटेन्शियल नक्कीच आहे ह्या भावनेने उत्सुकतेने आणि कौतुकाने ऐकले जाते. परंतु माझ्या फळीतले कलाकारांना सीनिअर आणि गुरू ह्या दोन्ही भूमिकांमध्ये जोखले जाते. लहानशा चुकीलाही माफी दिली जात नाही उलट आम्ही दिलेल्या प्रतिक्रियेवर ’बर्रर, डोक्यात हवा गेलेली दिसत्ये. आता हे स्वतःला लिजंड समजायला लागलेले दिसतायत ह्या दृष्टीने पाहिले जाते. पंडित अभिषेकी जे माझे गुरू होते, ते अनेकदा म्हणत व्यावसायिक कलाकार म्हणून या क्षेत्रात उतरायचे असेल तर गेंड्याची कातडी पांघरावी लागते. संवेदनशीलता कलेत लावायची, लोकं काय म्हणतील यात नाही. तुमची सर्वात जास्ती वचनबद्धता ही संगीताप्रती असली पाहिजे कारण, तुम्ही आता अपरिपक्व नाही राहिलात, लोकं तुमच्याकडे एक प्रस्थापित कलाकार म्हणून पाहिलं लागलेले असतात. तरुण पिढीसाठी रोल मॉडेल झालेले असता.

**पिंपळखरे गुरुजींनंतर व्यावसायिक गायक बनण्याच्या दृष्टीने संगीताची पायाभरणी ही अभिषेकी बुवांकडेच झाली, जितेंद्र अभिषेकी बुवांच्या काही आठवणी सांगा.**

अभिषेकी बुवा स्त्री दाक्षिण्य जपणारे आणि एकंदरीतच मितभाषी होते. त्यांच्याकडून त्यांचे विचार आणि संगीत काढून घ्यायला लागायचं. शिष्याशी बुवांशी सूर जुळले म्हणजे अर्थातच एका तरल आणि अमूर्त पातळीवर तर ते शिष्य खऱ्या अर्थाने भाग्यवान ठरायचे. माझा त्यांच्याकडे शिकण्याचा योग वयाच्या १८/१९ वर्षी आला. त्यावेळी लौकिक अर्थाने त्यांचं मोठेपण कळण्यासाठी मी लहान होते. त्या वयात असणाऱ्या निरागसतेचा मला खूप फायदा झाला. त्याकाळी बुवांनी माझ्यावर त्यांच्या मुलीप्रमाणे केलेलं अव्यक्त प्रेम त्यांच्या पश्चात मला खऱ्या अर्थाने पोरकेपणाची जाणीव करून गेलं.

**बुवांच्या नंतर पद्माताईंकडे तुम्ही शिकायला सुरुवात केलीत तेव्हा संगीत क्षेत्राकडे व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून बघायला लागला होतात त्याविषयी आणि पद्माताईंविषयी थोडे सांगा.**

ते वय असं होतं की, जेव्हा स्वतःचा आत्मशोध सुरू असतो. आपलं व्यक्तिमत्व घडत असतं. आपल्या आवाजाचा, श्वासाचा, बौध्दीक आणि भावनिक कुवतीचा मागोवा घेण सुरू असत. संस्कारित होण्याचं ते वय होतं. पिंपळखरे गुरुजींनी, तंबोरा कसा लावायचा, स्वर कसा लावायचा याचं शिक्षण दिलं. त्यानंतर अभिषेकी बुआ, ते म्हणजे ‘बोलांचा बादशहा’. एका छोट्याशा गोष्टीचं रसाळ आणि भावूक आख्यान कसं होऊ शकत ते मी त्यांच्याकडून शिकले. त्यानंतर संगीत साधनेची प्रखरता कशी वाढवू शकता असा खोल विचार करायला मी ताईंकडून शिकले त्यावेळी त्या त्यांच्या सांगीतिक वाटचालीच्या शिखरावर होत्या. दौरे, कार्यक्रम भरपूर प्रमाणावर होत होते. प्रत्यक्ष शिकण्याबरोबरीने निरीक्षणातून खूप शिकायला मिळालं, अध्यात्मिक बैठक अनुभवायला मिळाली.

**संगीताच्या आणि वयाच्या या टप्प्यावर नेमक काय घ्यायचं आणि काय सोडायचं ह्या विचारावर थोडा प्रकाश टाका.**

ही प्रक्रिया खूप महत्वाची असते. अनेकदा खूप चांगलं असूनही ते आपल्या सांगीतिक प्रकृतीला योग्य आहे का हे जोखण महत्वाचं असत. किशोरीताईंच्या गाण्यातून नेमकं काय घ्यायचं आणि ते कसं आत्मसात करायचं याच शिक्षण अप्रत्यक्षपणे मला त्यांचे शिष्य अरुण द्राविड यांच्याकडून मिळालं.

**दैवी देणगी मिळालेल्या नवीन पिढीच गाणं, स्पर्धा आणि शास्त्रीय संगीताचा विकास ह्या सगळ्याकडे तुम्ही कसं बघता?**

कलेविषयी असलेली नैतिकमूल्य आणि व्यावसायिकता याची गल्लत न करता काळाप्रमाणे गाण्यात घडणारे बदल हे अपरिहार्य आहेत. तरुण गायकांना इतकं एक्सपोजर मिळणं हे ही आता काळाच्या ओघाने आलंच. त्यामुळे कुठलीही टोकाची भूमिका न घेता त्याचा समतोल राखत गायिकी साकारणं हे अधिक महत्वाचं. लहान मुलांसाठी होणाऱ्या गाण्यांच्या स्पर्धेच्या आयोजकांची जबाबदारी ह्यात अधिक ठरते.

**शास्त्रीय संगीत म्हणजे नेमकी काय आहे व ते कसं ऐकायचं ?**

मुळात चुकीच्या संगीत प्रकाराला शास्त्रीय म्हणू नका. कुठलाही गाण्याचा प्रकार टाकाऊ किंवा निकृष्ट नक्कीच नाहिये परंतु त्या बाबतीत लोकांना चुकीचं गाईड करू नका. सोशल मीडियामुळे सगळ्या गोष्टी फास्ट झाल्या असतील तरीही रसिकांसाठी संगीताची उपलब्धता पण खूप आहे. एखादा राग विस्तारित स्वरुपात घरबसल्या ऐकणेही तेव्हढेच सोयीचे झाले आहे. कलेचे संस्कार लहान वयात करायची जबाबदारी ही आई वडिलांची आहे. आलाप, ताना, मुरक्या हा शास्त्रीय संगीताचा अविभाज्य भाग असला तरी हेच म्हणजे संगीतातील सर्वस्व नव्हे. त्याचं अंतिम धेय हे शांतता आणि समाधान प्राप्त करून देणे हेच आहे.

Registered-RNI no. 54781/92
Postal Reg. No. MCN/176/2018-2020
Posed at VileParle(E) PO Mumbai-57 on 1st of every month

License to post without prepayment
WPP License no. : MR/Tech/WPP-167/North/2018-20

Date of publishing : 01.09.2020
Total pages incl. cover : 07



# वृत्तविशेष

## डॉ. समिरा गुजर यांना 'माझा' पुरस्कार



नुकताच रंगकर्मी अशोक मुळे ह्यांच्या वतीने डॉ. समिरा गुजर ह्यांना नाट्यशास्त्र विषयात संशोधन करुन पीएचडी पदवी मिळवल्याबद्दल 'माझा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. जेष्ठ पत्रकार राजीव खांडेकर ह्यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. 'माझा पुरस्कारा'चे हे १३ वे वर्ष. अशोक मुळे कला आणि सामाजिक क्षेत्रात स्तुत्य आणि चाकोरीबाहेरचे मोलाचे काम करणा-या गुणीजनांचा हा पुरस्कार देऊन कौतुक करतात.कोरोनाच्या पार्श्वभूमी नेहमीप्रमाणे मोठा समारंभ शक्य नसला तरी गजालीचे मधुकर शेट्टी तसेच मुळे काकांचे स्नेही भास्कर शिंदे यांनी पुढाकार घेऊन श्री. मुळे ह्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला. ह्या कार्यक्रमास सुप्रसिद्ध कलाकार हृषिकेश जोशी, सौ जान्हवी खांडेकर, गायक जयंत पिंगुळकर, माझा पुरस्काराचे स्मृतिचिन्ह घडविणारे विजय सोनावणे अशा अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यंदा नाट्यसंमेलनाचे १००वे वर्ष. प्राप्त परिस्थितीत संमेलन अजून होऊ शकले नसले तरी ह्या वर्षात एका कलाकाराने नाट्यशास्त्र आणि मराठी रंगभूमी ह्यांचे नाते सांगणारे संशोधन पूर्ण करावे आणि त्याची दखल 'माझा पुरस्कारा'ने घेतली जावी ह्या विषयी समाधान व्यक्त केले.

## संजीव करंडे यांची सांगीतिक भरारी



गेली चाळीस वर्षेअमेरिकेत स्थायिक असलेले संजीव करंडे हे पार्लेटिळक विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि मूळचे पार्लेकर. व्यवसायाने गेली अनेक वर्षेआय.टी क्षेत्रात असूनही त्यांनी त्यांची कला, कविता आणि संगीताची आवड जोपासली. गेली काही वर्षेते गीतकार आणि संगीतकार म्हणून काम करत आहेत. नुकतेच त्यांचे नवीन स्तवन गीत 'श्री शांतादुर्गा वंदना' सादर केलं असून गीतकार, संगीतकार आणि निर्माता ह्या तीनही जबाबदाऱ्या उत्तम रीतीने पार पाडल्या आहेत. त्यांनी हे गीत संस्कृतप्रचुर मराठी भाषेत लिहिलं आहेत असून हे गीत जयपूर घराण्याच्या तरुण आणि दमदार गायिका आणि ज्येष्ठ विदुषि अश्विनी भिडे देशपांडे यांच्या शिष्या, ऋतुजा लाड यांनी गायलं आहे.

या व्यतिरिक्त गेल्या दोन वर्षात संजीव करंडे यांनी संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून सुप्रसिध्द गायक राहुल देशपांडे आणि गायिका आहे आर्या आंबेकर यांच्या आवाजात अजून काही गाणी गीतबद्ध आणि संगीतबद्ध केली आहेत. करंडे यांच्या संगीत क्षेत्रातील पुढील वाटचालीस अनेक शुभेच्छा.

## मोडी अभ्यासक्रम

दिनांक ८ नोव्हेंबर २०२० पासुन साठये महाविद्यालयाचा इतिहास विभाग दरवर्षीप्रमाणे मोडी व ब्राह्मी , खरोष्टी व शारदा या प्राचीन भारतीय लिपींच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या नव्या बॅचेस ऑनलाईन सुरू करत आहेत.

एकंदरीत तीन अभ्यासक्रमाच्या बॅचेस सुरु होत आहेत. यात मोडीचे अजिबात ज्ञान नसलेल्यांसाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम तर जुजबी ज्ञान असणार्यांसाठी प्रगत अभ्यासक्रम अशा मोडीच्या दोन अभ्यासक्रमाच्या बॅचेस् आहे. याशिवाय प्राचीन भारतीय लिपींच्या अभ्यासक्रमाची पण बॅच आहे.

